# कृषी कर्जमाफी व कर्ज परतफेड सवलत योजनेचा संस्थांना झालेला लाभ

**प्रा. घाडगे जे.एस.**
अर्थशास्त्र विभाग, टी.सी.कॉलेज, बारामती

**प्रस्तावना :**

'भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये शेतीला महत्वाचे स्थान आहे. राष्ट्राचा विकास हा बहुतांशी शेती क्षेत्राच्या भरभराटीवर अवलंबुन असतो.'[1] कृषी क्षेत्राचा विकास हा संस्थात्मक वित्त पुरवठ्यावर अवलंबून असून जगातील बहुतांश देशात संस्थात्मक पतपुरवठ्याचा विकास सहकारी पतसंस्थांच्या धर्तीवर केला आहे. भारतात सहकाराचा प्रारंभ ग्रामीण जनतेच्या दारिद्र्यातून व पिळवणूकीतून झाला. 1904 मध्ये पहिला सहकारी कायदा अस्तित्वात आला आणि सहकारी संस्था स्थापन करण्याला विधिवत सुरूवात झाली. आणि '1905 साली त्यावेळच्या मुंबई राज्यातील, धारवाड जिल्हयातील, कणगीहल येथे पहिली सोसायटी स्थापन झाली. ही शेती क्षेत्रातील पहिली सहकारी संस्था होय'[2] नंतर या संस्थेच्या कार्यक्षमतेत वाढ होऊन गाव पातळीवर विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी या टप्प्यापर्यंत येवून पोहचली. मात्र 'देशात आदर्श ठरलेल्या सहकारी चळवळीबाबत सध्या संशयाची परिस्थिती निर्माण झालेली आहे.'[3] कारण ग्रामीण भागात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या प्राथमिक कृषी पतसंस्थांचे अस्तित्व धोक्यात आलेले आहे.

देशात सन 2003 मध्ये असणाऱ्या 112309 प्राथमिक कृषी पतसंस्थांचा संचित तोटा रूपये 4595 कोटी होता. तर 58683 संस्था फायदयात व 53626 संस्था तोटयात होत्या. महाराष्ट्रात एकूण सहकारी संस्थांच्या संख्येत प्राथमिक कृषी पतसंस्थांची संख्या सन 1961 मध्ये 67.92 प्रतिशत होती ती सन 2008 मध्ये 10.30 प्रतिशत पर्यंत घटली आहे. 'महाराष्ट्रात मार्च 2009 अखेर 21240 प्राथमिक कृषी पतसंस्था असून त्यांचे थकबाकीचे येणे कर्जाशी प्रमाण 46.06 प्रतिशत होते. एकूण संस्थापैकी 10879 संस्था तोटयात असून त्यांचा तोटा 39503 लाख रूपयांचा होता.'[4]

पुणे जिल्हयात मार्च 2010 अखेर 1293 प्राथमिक कृषी पतसंस्था असून त्यापैकी 595 (रूपये 363964) संस्था तोटयात होत्या. या संस्थांचे थकबाकीचे येणे कर्जाशी प्रमाण 36.79 प्रतिशत होते. पुणे जिल्हयातील बारामती तालुक्यात मार्च 2010 अखेर 193 प्राथमिक कृषी पतसंस्था असून त्यापैकी 86 (44.56प्रतिशत) संस्था तोटयात होत्या. या संस्थाचे थकबाकीचे येणे बाकीशी प्रमाण 31.84 प्रतिशत होते. तसेच 'इंदापुर तालुक्यात मार्च 2009 अखेर 172 प्राथमिक कृषी पतसंस्था होत्या त्यापैकी नफ्यातील संस्थांना 1498.18 लाख रूपयांचा नफा व तोटयातील संस्थांना 199.74 लाख रूपयांचा तोटा झाला आहे.'[5]

अशाप्रकारे प्राथमिक कृषी पतसंस्थांचे थकबाकीत कर्जाचे प्रमाण वाढत आहे, अनुत्पादक जिंदगी वाढत आहे, अनिष्ट तफावतेमध्ये वाढ होत आहे, नफ्यातील संस्था घटून तोठ्यातील संस्था व त्यांचा तोटा वाढत आहे. यामुळे त्रिस्तरीय सहकारी पतयंत्रणाही आर्थिक संकटात सापडली आहे. शेतकऱ्यांची थकबाकी माफ करण्यासाठी किंवा कमी करण्यासाठी केंद्र व महाराष्ट्र राज्य शासनाने कृषी कर्जमाफी व कर्ज परतफेड सवलत योजना अमंलात आणली. सदर योजनेचा केवळ थकबाकीदार शेतकऱ्यांना लाभ झाला नाही तर शेतकऱ्यांनी ज्यांच्याकडून कर्ज घेतले आहे त्या वित्तीय संस्थांनाही झाला आहे. कारण प्रस्तुत योजनेनुसार शेतकऱ्यांची संस्थांकडील थकबाकी माफ केल्यास किंवा सवलत दिल्यास संस्थांनी ज्यांच्या कडुन कर्ज घेतले आहे अशा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकाकडील त्यांची थकबाकी माफ होते किंवा सवलत मिळते.

**कर्जमाफी व कर्जपरतफेड सवलत योजना :**

केंद्र शासन योजना 2008 या योजनेचा 1 एप्रिल 1997 पूर्वी स्विकारलेल्या मात्र पुनर्गठीत झालेल्या तसेच 1 एप्रिल 1997 ते 31 मार्च 2007 या कालावधीत स्विकारलेल्या, 31 डिसेंबर 2007 रोजी थकीत झालेल्या व 28 फेब्रुवारी 2008 पर्यंत परतफेड न केलेल्या कर्जदार शेतकऱ्यांना झाला आहे. सदर योजनेनुसार '2 हेक्टर पर्यंत क्षेत्र असलेल्या थकबाकीदार शेतकऱ्यांचे संपूर्ण कर्जमाफ झाले तर 2 हेक्टरपेक्षा अधिक क्षेत्र असलेल्या थकबाकीदारांना एकूण थकबाकीच्या परतफेडीवर 25% सवलत मिळाली.[6] अर्थात सदर योजनेच्या लाभापासून काही शेतकरी वंचित राहिले म्हणून महाराष्ट्र शासन कृषी कर्जमाफी व कर्ज परतफेड सवलत योजना अंमलात आणली.

'महाराष्ट्र शासन योजना 2009 या योजनेचा वंचित थकीत शेतकरी, कर्जाची परतफेड करणारे वंचित थकीत शेतकरी आणि कर्जाची परतफेड करणारे वंचित नियमित शेतकरी यांना लाभ झाला. योजनेनुसार 20,000 रूपयांपर्यंत थकबाकी असल्यास कर्जमाफी अंतर्गत संपूर्ण थकबाकी माफ झाली आहे. व 20,000 पेक्षा जास्त थकबाकी असल्यास 20,000 रूपयावरील उर्वरीत रक्कमेचा भरणा केल्यानंतर 20,000 रूपयापर्यंत सवलत मिळाली आहे.'[7]

प्रस्तुत योजनांचा जिरायत व बागायत भागातील प्राथमिक कृषी पतसंस्थांना अगर त्यांच्या सभासदांना कमी जास्त लाभ होणार हे स्पष्ट होते. कारण जिरायत भागात शेतकऱ्यांना अधिक जमीन आहे व बागायत भागात शेतकऱ्यांना कमी जमीन आहे. एकंदरीत कृषी कर्जमाफी व कर्ज परतफेड सवलत योजनेचा जिरायत व बागायत भागातील प्राथमिक कृषी पतसंस्थांना झालेला लाभ अभ्यासणे हाच संशोधन लेखाचा उद्देश आहे.

**संशोधन लेखाचे उद्दिष्ट :**

कृषी कर्जमाफी व कर्ज परतफेड सवलत योजनेचा जिरायत व बागायत भागातील प्राथमिक कृषी पतसंस्थांना झालेला लाभ अभ्यासणे.

**संशोधन लेखाचे गृहितक :**

बागायत भागातील प्राथमिक कृषी पतसंस्थेला केंद्र व महाराष्ट्र राज्य शासनाच्या कृषी कर्जमाफी व कर्ज परतफेड सवलत योजनेचा जिरायत भागातील संस्थेपेक्षा अधिक लाभ झाला आहे.

**संशोधन लेखाची व्याप्ती :**

राष्ट्रीयकृत बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, भूविकास बँका, नागरी सहकारी बँका आणि प्रादेशिक ग्रामीण बँका इत्यादीकडून शेतकऱ्यास दिलेल्या कर्जास कर्जमाफी व कर्ज परतफेड सवलत मिळाली आहे. सदर वित्तीय संस्थांना योजनेचा झालेला लाभ न अभ्यासता केवळ बारामती व इंदापूर तालुक्यातील प्राथमिक कृषी पतसंस्थांच्या सभासदांना अर्थात संस्थांना झालेला लाभ अभ्यासला आहे.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत संशोधन लेख प्राथमिक आणि दुय्यम स्त्रोतांवर आधारीत आहे. बारामती व इंदापूर तालुक्यातील 365 प्राथमिक कृषी पतसंस्थापैंकी 38 संस्थांची नमुना म्हणुन निवड करून त्यांच्याकडून दुय्यम सामग्री संकलित केली आहे. व सदर नमुना संस्थांच्या 380 लाभार्थी सभासदांकडून व 38 सचिवांकडून प्राथमिक सामग्री संकलित केली आहे.

जिरायत व बागायत भागातील प्राथमिक कृषी पतसंस्थेला केंद्र व महाराष्ट्र शासनाच्या कृषी कर्जमाफी व कर्ज परतफेड सवलत योजनेचा झालेला लाभ अर्थात संकलीत केलेली दुय्यम सामग्री पुढील तक्ता क्र.1 मध्ये दर्शविली आहे.

**तक्ता क्रमांक 1**
**संस्थेची केंद्र व महाराष्ट्र शासन योजनेअंतर्गत लाभ रक्कम**

(रूपये लाखात)

| तपशील | | लाभ रक्कम | |
|---|---|---|---|
| | | जिरायत संस्था | बागायत संस्था |
| अ) केंद्रशासन योजना | कर्जमाफी | 28.53 | 66.03 |
| | कर्ज परतफेड सवलत | 18.02 | 10.46 |
| ब) महाराष्ट्र शासन योजना | कर्जमाफी | 2.08 | 7.75 |
| | कर्ज परतफेड सवलत | 4.6 | 5.6 |
| **एकूण (अ+ब)** | | **53.23** | **89.84** |

स्त्रोत : प्राथमिक कृषी पतसंस्थांचे वार्षिक माहिती तक्ते

अध्ययन तालुक्यातील जिरायत व बागायत भागातील संस्थेचे केंद्र व महाराष्ट्र शासन योजने अंतर्गत क्षेत्रीय पाहणीतील लाभार्थी सभासद पुढील तक्ता क्र. 2 मध्ये दर्शविले आहेत.

**तक्ता क्रमांक 2**
**संस्थेचे केंद्र व महाराष्ट्र शासन योजनेअंतर्गत नमुना लाभार्थी सभासद**

(सभासद संख्येत)

| तपशील | | लाभ रक्कम | |
|---|---|---|---|
| | | जिरायत संस्था | बागायत संस्था |
| अ) केंद्रशासन योजना | कर्जमाफी | 42(47.73) | 146(79.78) |
| | कर्ज परतफेड सवलत | 46(52.27) | 37(20.22) |
| **एकूण (अ)** | | **88(100)** | **183(100)** |
| ब) महाराष्ट्र शासन योजना | कर्जमाफी | 14(43.75) | 41(53.25) |
| | कर्ज परतफेड सवलत | 18(56.25) | 36(46.75) |
| **एकूण (ब)** | | **32(100)** | **77(100)** |
| **एकूण (अ+ब)** | | **120(100)** | **260(100)** |

❖ कंसातील आकडे एकूणाशी प्रतिशत प्रमाण दर्शवितात.
स्त्रोत : क्षेत्रीय सर्वेक्षण 2010

**महत्वाचे निष्कर्ष :**

1) केंद्र व महाराष्ट्र शासनाच्या कृषी कर्जमाफी व कर्ज परतफेड सवलत योजनेचा बागायत भागातील संस्थेच्या सभासदांना 89.85 लाख रूपयांचा लाभ मिळाला आहे. तर जिरायत भागातील संस्थेच्या सभासदांना 53.23 लाख रूपयांचा लाभ मिळाला आहे. अर्थातच सदर योजनेचा बागायत भागातील संस्थेला जिरायत भागातील संस्थेपक्षा अधिक लाभ झाला आहे.

2) केंद्र शासनाच्या कृषी कर्जमाफी व कर्ज परतफेड सवलत योजनेचा बागायत भागातील संस्थेच्या सभासदांना 76.49 लाख रूपयांचा तर जिरायत भागातील संस्थेच्या सभासदांना केवळ 46.55 लाख रूपयांचा लाभ मिळाला आहे. म्हणजेच केंद्र शासन योजनेचा बागायत भागातील संस्थेला सापेक्षतः अधिक लाभ झाला आहे.

3) महाराष्ट्र शासन कृषी कर्जमाफी व कर्ज परतफेड सवलत योजनेतंर्गत बागायत भागातील संस्थेच्या सभासदांना 13.35 लाख रूपयांचा व जिरायत भागातील संस्थेच्या सभासदांना 6.68 लाख रूपयांचा लाभ मिळाल्याने सदर योजनेचाही बागायत भागातील संस्थेला अधिक लाभ झाल्याचे स्पष्ट होते.

4) केंद्र शासनाच्या कर्जमाफी योजनेचा बागायत भागातील संस्थेच्या सभासदांना 66.03 लाख रूपयांचा व जिरायत भागातील संस्थेच्या शेतकरी सभासदांना 28.53 लाख रूपयांचा लाभ झाला आहे.

5) महाराष्ट्र शासन कर्जमाफी अंतर्गत बागायत भागातील संस्थेच्या सभासदांना 7.75 लाख रूपयांचा आणि जिरायत संस्थेच्या सभासदांना 2.08 लाख रूपयांचा लाभ मिळाला आहे. एकंदरीत सदर योजनेचाही बागायत भागातील संस्थेला तुलनेने अधिक लाभ झाला आहे.

6) केंद्र शासनाच्या कर्जमाफी योजनेतंर्गत संपूर्ण कर्जमाफ झालेले बागायत भागातील संस्थेचे 79.78 प्रतिशत व जिरायत भागातील संस्थेचे 47.73 प्रतिशत नमुना लाभार्थी आहेत. अर्थात संपूर्ण कर्जमाफ झालेले सभासद बागायत भागातील संस्थेचे सापेक्षतः अधिक आहेत.

7) बागायत भागातील संस्थेच्या 20.22 प्रतिशत व जिरायत भागातील संस्थेच्या 52. 27 प्रतिशत नमुना लाभार्थींना एकूण थकबाकींपैकी 75 प्रतिशत थकबाकीचा भरणा केल्यास 25 प्रतिशत सवलत देणाऱ्या केंद्र शासनाच्या कर्ज परतफेड सवलत योजनेचा लाभ मिळाला आहे. जिरायत भागातील संस्थेच्या नमुना लाभार्थींना केंद्र शासनाच्या कर्ज परतफेड सवलत योजनेचा सापेक्षतः अधिक लाभ मिळाला असला तरी सदर लाभार्थींनी एकूण थकबाकीपैकी 75 प्रतिशत थकबाकीचा भरणा केला आहे.

8) महाराष्ट्र शासनाच्या कर्जमाफी योजनेचा बागायत व जिरायत भागातील संस्थेच्या अनुक्रमे 53.25 प्रतिशत व 43.75 प्रतिशत नमुना लाभार्थींना लाभ झाला आहे. यावरून कमाल 20,000 रूपये पर्यंत थकबाकी असल्यास संपूर्ण थकबाकी माफ झालेले सभासद बागायत भागातील संस्थेचे तुलनेने अधिक असल्याचे स्पष्ट होते.

9) बागायत व जिरायत भागातील संस्थेच्या अनुक्रमे 46.75 प्रतिशत व 56.25 प्रतिशत नमुना लाभार्थींना महाराष्ट्र शासनाच्या कृषी कर्ज परतफेड सवलत योजनेचा लाभ मिळाला आहे. जिरायत भागातील संस्थेच्या सभासदांना सदर योजनेचा जरी सापेक्षतः अधिक लाभ मिळाला असला तरी अशा सभासदांना 20,000 रूपयावरील उर्वरीत रक्कमेचा भरणा केल्यानंतरच 20,000 रूपयापर्यंतची कर्ज परतफेड सवलत मिळाली आहे. म्हणजेच जिरायत भागातील संस्थेच्या अधिक सभासदांनी 20 हजार रूपयांवरील थकबाकीचा भरणा केला आहे. जिरायत भागातील संस्थेला किंवा त्यांच्या सभासदांना सदर योजनेचा कमी लाभ मिळाला आहे.

उपरोक्त निष्कर्षावरून बागायत भागातील प्राथमिक कृषी पतसंस्थेला केंद्र व महाराष्ट्र शासनाच्या कृषी कर्जमाफी व कर्ज परतफेड सवलत योजनेचा जिरायत भागातील संस्थेपेक्षा अधिक लाभ झाल्याचे गृहितक सिध्द होते.

**उपाययोजना :**

1) शासनाने कोणत्याही योजनेची आखणी करताना जिरायत भागातील प्राथमिक कृषी पतसंस्था आणि बागायत भागातील प्राथमिक कृषी पतसंस्था यांच्यामध्ये फरक करावी की, जेणेकरून जिरायत भागातील संस्थांची ज्वलंत समस्या दूर होवून त्याचा त्यांना लाभ होईल.

2) शासनाने जिरायत भागातील संस्थांसाठी कर्ज कोणत्या काळात वाटप केले आहे हे विचारात न घेता सरसकट कर्ज माफीचे धोरण राबविणे आवश्यक होते की, ज्यामुळे सदर संस्थांना अधिक लाभ झाला असता.

**संदर्भ सूची :**

1. Prasad A, Primary Agricultural Co-operative societies in India problems and remedies, The Maharashtra Co-operative quarterly, April – June 2006, P-8

2. भगत बी.टी., सहकारी शेती पतपुरवठा सिंहावलोकन व बांगला देशाचे ग्रामीण बँकेपासून घ्यावयाचा
बोध, सहकारी महाराष्ट्र विशेषांक, नोव्हेंबर –डिसेंबर 2006, पृष्ठ कं.31

3. जिल्हा वार्ता, सहकार क्षेत्राच्या पुनर्मूल्याकंनासाठी समिती नेमणार–सहकार मंत्र्याचे प्रतिपादन, सहकारी
महाराष्ट्र, जून 2007, पृष्ठ क. 24

4. महाराष्ट्रातील सहकारी चळवळ एका दृष्टी क्षेपात 2009, सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य–पुणे, 46वे प्रकाशन, पृष्ठ कं. 47

5. इंदापूर तालुका सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था, इंदापुर, वार्षिक माहिती तक्ते.
6. वृत्त संस्था, 3.68 कोटी शेतकऱ्यांना कर्जमाफीचा फायदा, लोकमत (पुणे),6 मार्च 2006, पृष्ठ क्र.1
7. महाराष्ट्र शासनाचे राजपत्र, सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्थांच्याकडुन संकलीत.
8. राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बॅंक पुणे, वार्षिक अहवाल सन 2010–11
9. पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंक, मर्यादित पुणे, वार्षिक अहवाल सन 2010–11